पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ७

**सभावृत्तांत**

दिनांक - **१५/१२/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१५/१२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सौ.स्वाती प्रमोद साने - सभापती**
२. मा.सौ.पानसरे अमिना महंमद
३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४. मा.जाधव साधना रामदास
५. मा.पालांडे सुजाता सुनिल
६. मा.पाटील सुजित वसंत
७. मा.चोंधे आरती सुरेश
८. मा.भालेकर अरुणा दिलीप
९. मा.बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.दंडवते – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.रत्नपारखी – कार्यकारी अभियंता, मा.तुमराम – प्रशासन अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.तुपसाखरे– उपअभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला -**

विषय क्र.२) आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेबाबत – मा.आरती चोंधे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ३५ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १५/१२/२०१५ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/दापोडी/टे-१२/९२/२०१५, दि.०८/१२/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे दापोडी भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन,नगरसचिव विभाग यांचेकडील अधिसुचना क्रं.पीसीसी- ३०९६/१८०१/सी.आर-२६१/नवि-२२. दि.११/०९/१९९७ अन्वये शासनाकडुन मंजुर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार दापोडी हे गाव पुणे मनपा मधुन पिं.चि.मनपा मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.मौजे दापेडी येथील स.नं.८५अ पैकी आरक्षण क्र.३/२८ किरकोळ बाजार प्रस्तावित केलेले आहे, सदरचे आरक्षण डि.पी.रिपोर्टनुसार सुमारे १०००.०० चौ.मी.क्षेत्रावर आहे. सदर आरक्षणाचे भूसंपादन प्रस्ताव महानगरपालिकेने पाठविला नाही. सद्यस्थितीमध्ये पुणे-मुंबई महामार्गापासुन सांगवी गावाकडे जाणा-या व रेल्वेलाईन फाटकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस भाजी मंडई आहे.सदरचा रस्ता खुपच वर्दळीचा असलेने सदर ठिकाणी रेल्वेलाईनच्या फाटकामुळे ब-याच वेळा अपघात होतात व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. तसेच मा.नगरसदस्यांची वारंवार मागणी आहे की मौजे दापोडी येथे भाजी मंडई ( किरकोळ बाजार ) चे आरक्षण विकसित करावे म्हणजे दापोडीमधील नागरिकांना भाजी खरेदीसाठी रेल्वेलाईन वरील फाटक ओलांडुन जाण्याची आवश्यकता भासणार नाही.त्यामुळे आ.क्र.३/२८( किरकोळ बाजार ) चे आरक्षणाची जागा लवकरात ताब्यात घेऊन भाजी मंडई (किरकोळ बाजार ) विकसित करावे. तरी सदरचे आरक्षणाचे जागेचा भुसंपादनाचा प्रस्ताव तयार केलेला असुन सदर भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठवावा लागणार आहे. सदर भुसंपादन पाठविणे कामी मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. केंद्र शासनाने “The Right to fair compensation and Transparency in land acquisition ,Rehabilitation Resettlement Act 2013” हा नविन भूसंपादन कायदा तयार केला असून दि.०१/०१/२०१४ पासुन सदरचा कायदा अंमलात आला आहे.तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नविन भूसंपादन कायदा अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाअधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**<u>सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला -</u>**

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १५/१२/२०१५

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ – मा.आरती चोंधे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव –

विषय - आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सौ.स्वाती प्रमोद साने )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८२८/२०१५
दिनांक : १९/१२/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Shahar Sudharna Samitee Proceeding 7doc.